ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# बसव दर्शनातील स्त्री विषयक विचार

* डॉ. उध्दव नरहरी कांबळे ,

* सहायक प्राध्यापक, तत्वज्ञान विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर

**सारांश :**

*महात्मा बसवेश्वर यांच्या तत्वज्ञानातील स्त्री विचार हा एक प्रमुख विचार आहे. समाजातील एक महत्वपूर्ण घटक म्हणून महात्मा बसवेश्वर स्त्री कडे पाहतात. समाजाचा विकास करायचा असेल तर स्त्री चा ही विकास झाला पाहिजे, ही भूमिका घेउन प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधात जाऊन स्त्रीयांना शिक्षित करतात. त्यांना सामाजिक,आर्थिक,राजकीय आणि धार्मिक अशा सर्व प्रकारच्या प्रवाहात सामिल करुन घेतात. परिणामत: मध्ययुगीन काल खंडातील स्त्री जीवन सर्वांग पूर्ण विकसित होते.म्हणूनच महात्मा बसवेश्वर यांना स्त्री जीवनाचे उद्धार कर्ते म्हटले जाते.*

**सुचक शब्द :-** *अनुभव मंटप , ज्ञान, शरण , समाजसुधारणा,धर्म ,शिक्षण .*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

## प्रस्तावना:

बसव दर्शनामध्ये मध्ययुगातील अनेक समाज सुधारणात्मक कार्याचा उल्लेख आपणास पहावयास मिळतो. त्यापैकी स्त्री विषयक विचार एक महत्वपुर्ण विचार आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये स्त्री वर्गास सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक अशा गोष्टीपासून अलिप्त ठेवून त्यांचे हक्क आणि अधिकार नाकारण्यात आले. यामुळे मध्यकाळात स्त्रीयांचा विकास झालेला नव्हता. हे वास्तव समजून घेऊन महात्मा बसवेष्वरांनी स्त्रीयांना त्यांचे हक्क, अधिकार मिळावेत, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता प्रयत्न केले. महात्मा बसवेष्वरांनी प्रामुख्याने स्त्रीयांना धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात संधीची उपलब्धता करून दिली. त्यांना त्यांचे हक्क व अधिकार प्राप्त करून दिले. या संधीच्या उपलब्धतेमुळे मध्यकाळात स्त्रीयांच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडून आला. सर्वच क्षेत्रात स्त्रिया ताठ मानेने जगू लागल्या, लिखाण, वाचन करू लागल्या. या संदर्भातील सविस्तर विचार सदर षोध निबंधात व्यक्त केला जाणार आहे.

## मुक्त विद्याज्ञान:

आज एकविसाव्या शतकातही देशात निरक्षरता आहे. मध्ययुगात काय स्थिती असेल? बसवेश्वरांनी निरक्षरांना साक्षर करण्याचे अभियान आरंभिले. त्यांना लिहिता वाचता यावे यासाठी त्यांच्या प्रारंभिक शिक्षणाची सोय अनुभव मंटपातच केली गेली. अनुभव मंटप हे संस्कारपीठ म्हणजे मुक्त विद्यापीठ. बसवेश्वरांच्या कल्पकतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा हा सर्जनात्मक आविष्कार होय. समाजातील सर्व जातीवर्णातील स्त्री-पुरुषांना अनुभव मंटपात बोलावून त्यांना बसवेश्वरांच्या पत्नी गंगालिका, नीलांबिका व बहीण

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

अक्का नागलांबिका यांच्या मार्गदर्शानाखाली प्रौढ शिक्षण देऊन साक्षर करीत. सर्वांना धार्मिक, सामाजिक आर्थिक विषयासंबंधी बोलते केले जाई. सर्व लोक आपली आत्मानुभुती व विचार मांडत. तत्व आणि व्यवहार यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करीत. अनुभव मंटपाचे एकूण सातशे सत्तर सदस्य असले तरी त्यापैकी दोनशे पंच्यान्नव शरण-शरणींनी वचने लिहून आपली आत्मानुभूती अक्षरवाडमयात अजरामर केली आहे.

बसवेश्वरांनी स्त्रियांना कायक करण्यास उद्युक्त केले. स्वावलंबी जीवन जगण्यास शिकविले. आज महिला सबलीकरणासाठी जे जे काही होत आहे, त्यांचा आरंभ बसवेश्वरांनी आपल्या राज्यात केलेला होता. आज कितीतरी वर्षानंतरही शनिदेवाच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश मिळत नाही. पुष्कळ देवालयातील गाभाऱ्यात महिलांनाच काय पण पुरुषांनाही प्रवेष नाही. या अधिकाराकरिता स्त्रीयांना संघर्ष करावा लागत आहे. म्हणूनच निश्चितपणे म्हणता येते की, महात्मा बसवेश्वर हे भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीचे अग्रणी होते.

**स्त्रियांची सुतकापासून मुक्तता:**

भारत देषात अनेक धर्मामध्ये विटाळ, सोवळे - ओवळे या संकल्पना पूर्वी आणि आजही अस्तित्वात आहेत. ही विटाळाची ब्राह्मणी संकल्पना अस्पृष्यांवरचा आणि स्त्रियांवरचा एक मोठा अन्यायच आहे. या सोवळ्या ओवळाच्या, विटाळाच्या माध्यमातून अस्पृष्य व स्त्रियांवर समाज व कुटुंबातील दुय्यमता लादण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. आजही समाजात एखाद्या बाळाला जन्म दिला, स्त्री रजःस्वला झाली तर तिचा विटाळ मानला जातो. एखाद्याचा घरात मृत्यू झाला तर काही दिवस सुतक पाळले जाते. यातील मृत्यूचा संदर्भ सोडला तर, बाकी संदर्भात स्त्रियांना पुरुषाच्या तुलनेत दुय्यमपणा देण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

स्त्रियांना विटाळाच्या नावाखाली समाजात आणि कुटुंबात दुय्यम स्थान देण्याच्या प्रकाराला महात्मा बसवेश्वरांनी प्रखर निषेध केला. गुरूव्दारे लिंगधारणा, पंचाचार व अष्टाचरण पालनाने भवबंधन, पुनर्जन्म, विटाळ, सुतक यापासून लिंगायत व्यक्ती मुक्त होते असे महात्मा बसवेश्वर म्हणतात. लिंगायत धर्मात रजःस्वला स्त्री सुध्दा गृहकृत्यात नेहमीप्रमाणे भाग घेऊ शकते. महात्मा बसवेष्वर असे म्हणतात की, ऋतस्नात रजस्वलेला अशुची, अस्पृष्य समजू नये. जातीचे सुतक, उच्छिष्टांचे सुतक, रजोसुतक जन्म आणि मृत्यू वेळचे सुतक अशी पाचही सुतके न पाळता इष्टलिंगोपासना व नित्यनैमित्तिक कर्मे करावीत.

**विधवा विवाह व सती बंदी:**

भारतीय समाजात अनेक वाईट प्रथांप्रमाणेच विधवांच्या विवाहाला परवानगी न देण्याची परंपरा ही मध्यकाळात प्रचलित होती. एखाद्या पत्नीच्या पतीचे निधन झाल्यानंतर तिला विधवा म्हणूनच रहावे लागत. धर्मशास्त्राने तिला पुनर्विवाह करण्याचा अधिकार नाकारला होता. एवढेच नव्हे तर ती अमंगल, अशुभ म्हणून तिला उत्सवामध्ये, समारंभामध्ये किंवा धार्मिक विधीमध्ये सहभाग नाकारला. त्यामुळे तिला फक्त अपमानास्पद जीवन जगावे लागत असे. पशुपक्षांना, प्राणिमात्रांना जो नैसर्गिक जीवन जगण्याचा हक्क आहे, तो नैसर्गिक हक्कच समाजात स्त्रियांना नाकारण्यात आला होता. परंतु याचवेळी पुरुषांना मात्र अनेक विवाह करण्याची धर्मग्रंथ

परवानगी देतात.

यातून स्त्री-पुरुष भेदाची दुटप्पी भूमिका धर्मशास्त्राची दिसून येते. महात्मा बसवेश्वरांनी ही गोष्ट बारकाईने ओळखली. वरील सर्व बाबतीत बसवेश्वर एकास-एक आणि दुसऱ्यास दुसरे याबाबतीत ते साशंक होते. म्हणूनच ते समाजातील धर्मपंडीतांना प्रष्न विचारतात की, स्त्री आणि पुरुषांना वेग-वेगळा न्याय का?

बाराव्या षतकात धाडसाने विधवांना अपशकुनी न मानता उत्सव, समारंभ, पवित्र धार्मिक विधीमध्ये मुक्तपणे उपस्थित राहण्याचा अधिकार बसवेश्वरांनी दिला.  बाराव्याशतकापर्यंत हिंदू विधवांची अपवित्र, अमंगल म्हणून हेटाळणी होत होती. तिचे केशवपन करून अलंकार, उंची वस्त्रे, चांगले भोजन ग्रहण न करण्यासाठी जी हजारो बंधने लादली होती. ती बंधन निषिध्द मानून विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार बसवेष्वरांनी दिला.

विधवा पुनर्विवाहाचा अधिकार नसल्याने संघर्षामध्ये उर्वरित आयुष्य घालविणे किंवा सती जाणे हे दोन पर्याय तिच्याकडे होते. हा प्रकार दक्षिण भारतातही काही प्रमाणात सुरू होता. बसवेष्वरांनी विधवा विवाहास परवानगी दिल्याने आपोआपच सती प्रथेवर अंकुश आला.

**वेश्यांचे पुनर्वसन:**

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्याने काही स्त्रियांना पोट भरण्यासाठी अनैतिक व्यवसाय करावा लागतो. तत्कालीन राजे, धनिक, सरदार, ढोंगी लोकांनी देवळातून 'देवदासी'च्या रूपात तरूणींना ठेवण्याची प्रथा रूढ केल्यामुळे असहाय व भोळया भाबड्या मुलींना नाईलाजाने वासनेच्या निखारांना बळी पडावे लागते या वास्तवाची बसवेश्वरांना जाण होती.

बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात 'संकव्वा' ही पुर्वायुष्यातील वैश्या होती. नंतर बसवादी शिव शरणाच्या पवित्र सहवासात आल्यानंतर तिला उपरती झाली. अषा या पष्चात्तापदग्ध षरणीचे पुढील उद्गार पहा -

" जे कर्म सोडून नवे व्रत घेतल
ते पुर्ण न करता
पुन्हा जुनेच कर्म करू लागले
तर तापलेल्या सुरीने
कान कापतील माझे,
निर्लज्जेश्वर "

अषा प्रकारे बाराव्या शतकात बसवेश्वरांनी व त्यांच्या सहकारी शरणांनी वेष्यांना मार्गदर्षन करून, त्यांचे विवाह घडवून आणून, त्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून दिले.

**स्त्रियांचे स्वावलंबन:** प्राचीन काळापासून आजतागायत पुरुषप्रधान व्यवस्थेने कुटुंबावर आपले कायमचे प्रभुत्त्व टिकवण्यासाठी स्त्रियांना आर्थिक हक्क मिळणारच नाहीत याची व्यवस्था केलेली दिसते. म्हणूनच तिला वेगवेगळ्या कारणांनी तिला शिक्षणापासून , राजकारणापासून, समाजकारणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. जर स्त्री सुषिक्षित झाली, जागरूक झाली, कमावती झाली तर, आपल्या वर्चस्वाला कुठेतरी तडा जाईल म्हणून तिला धार्मिक व सामाजिक बंधनात बांधून ठेवण्याचा, तिचे अधिकारक्षेत्र फक्त 'चूल आणि मूल' एवढया पर्यंत ठेवण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. परिणामतः ती स्वावलंबी न बनता नेहमीच ती गुलामाप्रमाणे जीवन जगत आली आहे. अशीच परिस्थिती जवळपास मध्यकाळात अस्तित्वात होती.

महात्मा बसवेष्वरांनी स्त्री शिक्षणाचे मूलगामी परिणाम जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. म्हणूनच त्यांनी आपल्या बंडखोरीचा जो पहिला प्रत्यय दिला, तो स्त्री शिक्षणाच्या अट्टहासासाठी. शिक्षण हे स्त्रियांना स्वावलंबन व सन्मानापर्यंत घेवून जात असल्यामुळे स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच उपनयन अधिकार मिळाला पाहिजे म्हणून आपल्या वडिलांसोबत महात्मा बसवेश्वरांनी वादविवाद केला. उपनयन आणि शिक्षण, शिक्षण आणि स्वावलंबन या बाबी परस्परांशी जोडलेल्या असल्यामुळे बसवेष्वरांनी स्त्री शिक्षणाचा अट्टाहास धरला होता. त्यांची सुरुवात त्यांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून केली. स्त्रियांच्या स्वालंबनासाठी त्यांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून लघुउद्योग, व्यवसायाचे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला.१० लघुउद्योग करणाÚया अनेक षरणीचे उदाहरणे पहावयास मिळतात. जसे रेमण्णा सूत कातण्याचे काम करत, रेणम्मा सौंदर्य प्रसाधने विकण्याचे काम करत तर काळम्मा सुतारकाम करत असे इ.

**स्त्रियांची काव्यात्म अभिव्यक्ती:**

अनुभव मंटपातील सत्याहत्तर स्त्रियांची नोंद संशोधकांनी केलेली असून पस्तीस शरणींची वचनसंपदा आजतागायत उपलब्ध झालेली आहे. सर्वात जास्त म्हणजे चारशे चैतीस वचने लिहिणारी 'अक्का महादेवी' ही होय. अक्का महादेवीच्या वचनावरून तिच्या विचारांची उंची कळेल.

''ष्वासच परिमळभरित असता
मग कुसुमाचा आश्रय कषाला
वसे क्षमा, षांती, निग्रह, सहिष्णुता
मग समाधीचा आश्रय कषाला ?
स्वयं जगत होऊनी राहता
मग एकांताचा आश्रय कशाला ?
प्रभू चेन्नमल्लिकार्जुना''

एकंदरीत महात्मा बसवेश्वर रांचा स्त्री विषयक दृष्टीकोन, स्त्रीउध्दारांचे त्यांचे कार्ये आजही दीप स्तंभाप्रमाणेच सर्वांना प्रकाशमान करणारे आहे. मध्ययुगात त्यांनी केलेला कार्याची प्रेरणा घेऊन आजच्या काळात त्यांचे विचार सर्वदूर पोहचवून समाजाला एक नवी दृष्टी देता येईल असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**संदर्भ:**


- दोडमनी शालिनी,(२०००):वचन साहित्य चिंतन, खंड १ व २, पृ.१०७.
- मेनकुदळे अशोक,( २००८):आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद,भालकी,पृ.१०६.
- सचिदा नंद बिचे वार,(२०१५):परिवर्नाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन,पूर्णा,पृ.५२.
- सचिदा नंद बिचे वार,(२०१५):परिवर्नाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन,पूर्णा,पृ.५२.
- साळुंखे आ.ह. ( २०१०): हिंदू संस्कृती आणि समाज, लोकवाङ:मयगृह,मुंबई ,पृ.८७.
- सचिदा नंद बिचे वार,(२०१५):परिवर्नाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन,पूर्णा,पृ.५४.
- इश्वरम हिरेमल्लुर, ( २००९ ): लिंगायत धर्म संस्कृती आणि समाज,सुविचार प्रकाशन,निलंगा,पृ.१३.
- बसव पथ,(२००८ ): बसव समिति,बेंगलूर,पृ.१४.
- जवरेगौडा दे.,(२००७): महात्मा बसवेश्वर-डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,हिरेमठ संस्थान,भालकी,पृ.६२.
- सचिदा नंद बिचे वार,(२०१५):परिवर्नाचा महामेरु महात्मा बसवेश्वर, स्वाती प्रकाशन,पूर्णा,पृ.५७.
- मेनकुदळे अशोक,( २००८):आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद,भालकी,पृ.१०२.
- मेनकुदळे अशोक,( २००८):आद्य समाजसुधारक महात्मा बसवेश्वर, महाराष्ट्र बसव परिषद,भालकी,पृ.१०२.



**Cite This Article:**

*डॉ. उध्दव नरहरी कांबळे (2022)* बसव दर्शनातील स्त्री विषयक विचार, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 159-163.*